# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि. १३/०९/२०२२

**प्रेसनोट**

**स्वच्छ भारत अभियान नागरी २.० च्या अनुषंगाने दि. १७ सप्टेंबर (सेवा दिवस) ते ०२ ऑक्टोबर २०२२ (गांधी जयंती आणि स्वच्छता दिवस) हा पंधरवडा "स्वच्छ अमृत महोत्सव" म्हणून साजरा करणेबाबत.**

स्वच्छ भारत अभियान नागरी २.० चे पूर्तता वर्ष तसेच स्वच्छ भारत अभियानाची ८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या अनुषंगाने गृहनिर्माण आणि शहरी कार्य मंत्रालय मार्फत दि. १७ सप्टेंबर २०२२ ते दि.०२ ऑक्टोबर २०२२ हा पंधरवडा "स्वच्छ अमृत महोत्सव" म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या "स्वच्छ अमृत महोत्सव" अंतर्गत "Rally of Youth for Garbage Free Beaches, Hills and Tourist Places" या मोहिमेचे "Indian Swachhata League" म्हणून करण्यात आलेले आहे. या मध्ये १८००+ शहरांनी सहभाग घेतलेला असुन वसई-विरार शहराचाही समावेश आहे. त्याकरिता खालील उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्याअनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेने दि. १७/०९/२०२२ रोजी सुरुची बिच, वसई येथे स्वच्छता मोहिमेचे आयोजन सकाळी ०८.०० ते १०.०० या वेळेत करणेत आलेले आहे.

| अ.क्र. | उपक्रमाचे विषय | दिनांक |
|---|---|---|
| १ | सुरुची बिच, वसई येथे युवक आणि युवतींची रॅली (Rally of Youth for Garbage Free Beaches, Hills and Tourist Places.) | १७/०९/२०२२ |

तरी नागरीकांनी या मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्याकरिता https://innovateindia.mygov.in/swachhyouthrally/ या लिंकवर अथवा खालील दिलेल्या बारकोड स्कॅन करुन आपला सहभाग दि. १७/०९/२०२२ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सर्व नागरीकांना "स्वच्छ अमृत महोत्सव" मध्ये सहभागी होणेकरिता महानगरपालिकेमार्फत आवाहन करण्यात येत आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका